# जाहीर नोटीस

जिगांव प्रकल्प

ता. नांदुरा                                   जि. बुलडाणा

जिगाव प्रकल्पांतर्गत मौजे कुंभारखेड ता.संग्रामपूर जि. बुलडाणा येथील उपसा सिंचन योजना क्र.४,५,६ चे आगमन मार्गालगतचे कामाकरीता संपादीत करण्यात येत असलेल्या खाजगी जमिनीची सरळ खरेदी करण्याबाबत पुर्वसुचना

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता, जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव जि.बुलडाणा ह्यांचे वतीने उपविभागीय अधिकारी जिगांव उपसा सिंचन उपविभाग क्र.२, खामगांव जि.बुलडाणा जाहीर नोटीस प्रसिध्दीस देतात की,

संग्रामपूर तालुक्यातील मौजे कुंभारखेड या गावातील सोबत प्रसिध्दीस दिलेल्या यादीतील जमीन धारकांना/मालकांना व नमुद केलेल्या शेत जमिनीशी ज्यांचा हितसंबंध आहे, अशा जमिन मालकांच्या शेतजमिनी/सरळ ख़रेदी-विक्री व्यवहाराने खाजगी जमीनीची खरेदी करण्याबाबत आक्षेप वजा हरकती असल्यास तसेच ज्यामध्ये सर्व बँक, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, वारस व इतर संबंधीत आदींचा समावेश आहे असे अधिकार अभिलेखावरुन दिसून येईल अशा सर्व व्यक्तींना ही जाहीर नोटीस प्रसिध्द दिनांकापासून १४ दिवसाचे आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या दस्तऐवजासह कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी, जिगांव उपसा सिंचन उपविभाग क्र.२, खामगांव जि.बुलडाणा (मोबाईल क्र. ९८२३६७८२६७) येथे आक्षेप व हरकती असल्यास दाखल कराव्यात. सदर कालावधी नंतर येणाऱ्या आक्षेप / हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरील जमिनीची सरळ खरेदी व्यवहार केल्या जाईल ह्याची नोंद घ्यावी. सोबत जमीन मालकांची त्यांचे ७/१२ नुसार गट / सर्व्हे नंबर निहाय खरेदी करावयाच्या क्षेत्रासह माहिती प्रसिध्दीस खाली दिली आहे.

| अ. क्र. | मौजे व तालुका | भूधारकाचे नाव | गट क्रमांक | ७/१२ नुसार क्षेत्र हे.आर | सरळ खरेदीद्वारे खरेदीचे क्षेत्र हे. आर. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुंभारखेड ता संग्रामपूर | अनंता शिवाजी धिरडे व इतर ४ | ५३ | ६.०३ | १.०५ | |
| | | | | एकुण क्षेत्र | १.०५ | |

दिनांक -२८/१०/२०२२

स्वा-

(एस.पी.जाधव)

उपविभागीय अधिकारी

जिगांव उपसा सिंचन उपविभाग क्र.२

खामगांव

# कार्यालयीन टिप्पणी

क्रमांक -२ दिनांक २८/१०/२०२२

विषय- जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावरती माहिती अपलोड करण्याबाबत

अ. अपलोड करण्याबाबत मागणी करणाऱ्या कार्यालयाने भरावयाची माहिती

| अ.क्र. | विषय | तपशिल |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल धारीकांचा विषय | सरळ खरेदीबाबत जाहीर प्रकटन |
| २ | अपलोड करण्याबाबत मागणी करण्यात आलेले कार्यालयाचे नाव | कार्यकारी अभियंता जिगांव उपसा सिंचन विभाग खामगांव |
| ३ | अपलोड करण्याविषयी मागणी करण्यात आलेल्या पत्राचा दिनांक | २८/१०/२०२२ |
| ४ | माहिती किती कालावधीसाठी अपलोड करावयाची आहे ? | १४ दिवस |
| ५ | कारण | महाराष्ट्र शासन परीपत्रक क्रमांक एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक २५ जानेवारी २०१७ नुसार सरळ खरेदी प्रकरणांत खरेदी करावयाच्या गट क्रमांकाबाबत जाहीर प्रकटन |
| ६ | संकेतस्थळावरील माहिती कोठे अपलोड करावी याचा तपशिल ( उदा.पत्र पेटी, घटना व प्रकटने ) | प्रकटने |
| ७ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल /धारीकांची संख्या | एक पान |

पुरविण्यात आलेली माहिती व संकेतस्थावरील अपलोड करण्यात येणारी कागदपत्रे तपासली असुन ती अचुक असल्याची खात्री करण्यात आलेली आहे, सदर अपलोड होणाऱ्या कागदपत्रांची संपुर्ण जबाबदारी ही या कार्यालयाची राहील.

उपविभागीय अधिकारी
जिगांव उपसा सिंचन उपविभाग क्र.२
खामगांव